# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:18.06.2026** **वार:गुरुवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पॅरिसमध्ये 'विव्हाटेक 2026' या शिखरपरिषदेत सहभागी होणार
2. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पुणे रेल्वे स्थानकावर विविध विकासकामांचा शुभारंभ, पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे 60 कोटी रुपयांची गुंतवणूक
3. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यादरम्यान 14 कलमी सामंजस्य करारामुळं पश्चिम आशियातील तणाव निवळण्यास सुरुवात, खनिज तेलाच्या किंमतीत घट
4. महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी आज मतदान आणि,
5. संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक-अभिनेते, पंडित प्रसाद सावकार यांचं वृद्धापकाळानं निधन

**पंतप्रधान-पॅरिस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स दौऱ्याच्या अंतिम टप्प्यासाठी काल रात्री फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये दाखल झाले. यावेळी भारतीय समुदायाच्या सदस्यांनी त्यांचं उत्साहात स्वागत केलं. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत 'विव्हाटेक' या शिखरप रिषदेत सहभागीहोतील. 'विव्हाटेक'हा युरोपमधल्या तंत्रज्ञान आणि स्टार्टअप क्षेत्रातला सर्वात मोठा कार्यक्रम आहे.

**मोदी**

जागतिक अर्थव्यवस्थेसाठी 'होर्मूझची सामुद्रधुनी' खुली ठेवणं अत्यंत महत्त्वाचं असल्याचं आग्रही प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या बरोबर काल फ्रान्समधील एव्हीयाँ इथं झालेल्या चर्चेदरम्यान केलं. जगाच्या विविध भागांमध्ये लाखो भारतीय खलाशी आपली सेवा बजावत आहेत, आणि त्यांच्या सुरक्षिततेस आपलं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारविषयक चर्चा सुरळीतपणे पुढे जात असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी आणि जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांच्यामध्ये पश्चिम आशियातील परिस्थिती आणि रशिया-युक्रेन संघर्ष यांसह प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर द्विपक्षीय चर्चा झाली. भारत आणि जर्मनी यांच्यातील राजनैतिक संबंधांना या वर्षी 75 वर्षे पूर्ण होत असताना, दोन्ही नेत्यांनी व्यापार, संरक्षण, शाश्वत विकास, तंत्रज्ञान, शिक्षण यांसारख्या विविध क्षेत्रांमधील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

**करार**

भारत-युके सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारामुळं भारत आणि ब्रिटन यांच्यातल्या द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळेल, असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आहे. या करारामुळं भारतीय शेतकरी, कामगार तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र आणि स्टार्टअप्ससाठी अनेक संधी उपलब्ध होतील, ज्यामुळं विकसित भारत 2047चं उद्दिष्ट साध्य करण्यात मोलाची मदत होईल, असंही पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे.

वैष्णव-रेल्वे

केंद्रीय रेल्वे तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णवयांच्या हस्ते काल पुणे रेल्वे स्थानकावर विविध विकासकामांचा शुभारंभ आणि पायाभरणी करण्यात आली. यावेळी पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसहे डिजिटल माध्यमातून सहभागी झाले. हडपसर स्थानकावर चौथा फलाट उभारण्यात आला असून त्यामुळं दररोज अतिरिक्त पाच रेल्वेगाड्या चालवणं शक्य होणार आहे. आळंदी इथं अत्याधुनिक मेगा कोचिंग टर्मिनल उभारण्यात येणार आहे. पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे 60 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून सहा नवीन फलाट उभारले जातील. त्यामुळे स्थानकावरील फलाटांची संख्या 12 होईल.

पुढील तीन वर्षांत पुणे रेल्वे विभागाची क्षमता दुप्पट होऊन पुण्यातून सुमारे 20 अतिरिक्त रेल्वेगाड्या सुरू करता येतील, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला. मुंबई–पुणे मार्गावर तिसरी आणि चौथी रेल्वेमार्गिका उभारण्याचं काम वेगानं सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच मुंबई–पुणे आणि पुणे–हैदराबाद या प्रस्तावित बुलेट ट्रेन मार्गांमुळं पुणे–मुंबई प्रवास अवघ्या 48 मिनिटांत, तर पुणे–हैदराबाद प्रवास सुमारे दोन तास आठ मिनिटांत पूर्ण होऊ शकेल, असं त्यांनी नमूद केलं. त्यानंतर, मंत्र्यांनी नवीन पुणे-हडपसर-पाटणा-दानापूर अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला.

वैष्णव-रांजणगाव

भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा इलेक्ट्रॉनिक्स निर्यातदार देश बनला आहे, असं मत केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केलं. ते काल पुण्याजवळ रांजणगाव इथं अमेरिकन कंपनी 'जाबिल'च्या नवीन उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत  होते. यावेळी वैष्णव म्हणाले....

**कुछ वर्षों पहले किसी ने सोचा भी था की इलेक्ट्रॉनिक्स एक्सपोर्ट करेंगे इंडिया से इलेक्ट्रॉनिक्स एक्सपोर्ट वास कन्सिडर्ड अनथिंकेबल शुरू में टॉप टेन में आना एक टारगेट था लास्ट यर ट्वेंटी ट्वेंटी फाइव इलेक्ट्रॉनिक्स एएस एएन एक्सपोर्ट कैटेगरी बिकेम थर्ड लार्जेस्ट एक्सपोर्ट। कैटेगरी इन थे कंट्री सेकंड लार्जेस्ट एक्सपोर्टेड कैटेगरी बनना है जो सपोर्ट चाहिएगा गवर्नमेंट की तरफ से पूरा सपोर्ट मिलेगा स्टेट गवर्नमेंट का सपोर्ट आपने देखा सेंट्रल गवर्नमेंट का सपोर्ट रहेगा आज मैं आने से पहले टैलेंट डेवलपमेंट की बात कर रहा था टैलेंट के लिए व्हाटेवर इन्वेस्टमेंट इस रिक्वायर्ड वे विल मेक दोज इन्वेस्टमेंट।**

देशातील डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासात महाराष्ट्र आघाडीवर असून देशातील एकंदर डेटा सेंटर क्षमतेपैकी सुमारे 60 टक्के क्षमता राज्यात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

करार

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी 14 कलमी सामंजस्य करारावर दूरस्थ पद्धतीनं स्वाक्षरी केली आहे, त्यामुळं पश्चिम आशियातील तणाव निवळू लागला आहे. खनिज तेलाच्या किंमतीमध्येही लगेच घट झाली आहे. दोन्ही देशांमधील शत्रुत्व संपवणं, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करणं आणि निर्बंध तसंच इराणच्या अणुकार्यक्रमाबाबत अंतिम करारासाठी 60 दिवसांची वाटाघाटी प्रक्रिया सुरू करणं हा या कराराचा उद्देश आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी दुजोरा दिला की, या सामंजस्य कराराचा मसुदा अंतिम करण्यात आला असून दोन्ही बाजूंनी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

विधान परिषद

महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी आज मतदान होत आहे. सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, नागपूर, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशीव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना अशा या अकरा जागा आहेत. तर ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत.

**झारखंड-राज्यसभा**

झारखंडमध्ये राज्यसभेच्या दोन जागांसाठी आज मतदान होणार आहे. या निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चाचे बैद्यनाथ राम, काँग्रेसचे उमेदवार प्रणव झा आणि अपक्ष उमेदवार परिमल नथवाणी हे रिंगणात आहेत. सध्या सत्ताधारी आघाडीला 56 आमदारांचा पाठिंबा आहे. 24 आमदारांचा पाठिंबा असलेल्या विरोधी पक्षानं अपक्ष उमेदवार परिमल नथवाणी यांना आपला पाठिंबा दर्शविला आहे.

**मिझोराम - आरएस पोल**

मिझोरममधून राज्यसभेच्या एकमेव जागेसाठी आज मतदान होणार असून, सत्ताधारी झोरम पीपल्स मूव्हमेंट आणि विरोधी मिझो नॅशनल फ्रंट यांच्या उमेदवारांमध्ये थेट लढत होणार आहे. भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसनं मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे.

**योगसंगम**

येत्या 21 जूनला होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्तानं 1 लाख सत्तर हजारांहून अधिक आयोजकांनी 'योग संगम' पोर्टलवर आपल्या कार्यक्रमांची नोंदणी केली असल्याचं केंद्रीय आयुष मंत्रालयानं सांगितलं आहे. देशभरात योगाचा संदेश पोहोचवण्यात विविध संस्था, संघटना आणि समुदाय यांचा वाढता सहभाग या उत्साही प्रतिसादातून दिसून येतो, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**निधन**

संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक-अभिनेते पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित पंडित प्रसाद सावकार यांचं काल गोव्यात राहत्या घरी निधन झालं. ते 98 वर्षांचे होते. मराठी संगीत नाट्यसृष्टीतील एक सुवर्णयुग पंडित प्रसाद सावकार यांच्या जाण्यानं संपल्याची भावना नाट्यसृष्टीतून व्यक्त होत आहे. प्रसाद सावकार यांनी आपले वडील रघुवीर सावकार यांच्या नाट्यसंस्थेतून संशयकल्लोळ या संगीत नाटकाद्वारे रंगभूमीवरील कारकीर्दीला सुरुवात केली. पंडितराज जगन्नाथ, कट्यार काळजात घुसली, जयजय गौरीशंकर, मंदारमाला, सुवर्णतुला, अमृतमोहिनी, लग्नाची बेडी यासारख्या अजरामर संगीत नाटकांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. रंगभूमीवरील त्यांचा दमदार अभिनय आणि सुरेल गायकी यांचा अनोखा संगम त्यांनी साधला होता, तो रसिकांच्या सदैव स्मरणात राहील.

**क्रिकेट**

भारत आणि अफगाणिस्थान यांच्यात लखनौमध्ये काल झालेल्या दुसऱ्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारतानं अफगाणिस्थानवर 170 धावांनी दणदणीत विजय मिळवला. शुभमन गिलच्या 154 आणि ईशान किशनच्या 125 धावांच्या जोरावर भारतानं 402 धावांचा डोंगर रचला. त्याला प्रत्युत्तर देताना अफगाणिस्थान 232 धावाच करू शकला. शुभमन गिलला सामनावीर घोषित करण्यात आलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.